# राजर्षि शाहू महाराज :

## सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती

(समाजशास्त्र)



: संपादक :

प्रा.आर.डी.राठोड

: मुख्य संपादक :

प्राचार्य, डॉ.आर.के.इप्पर

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISBN 978-93-5240-092-8

# अनुक्रमणिका


१. महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनामध्ये राजर्षी शाहू महाराजांचे धोरण व सद्यस्थिती
**डॉ.दिलीप खैरनार, श्रीमती स्वाती काळे** ...................... १७

२. राजर्षी शाहु महाराजांच्या शैक्षणिक विचारसरणी व कार्याचा समाजशास्त्रीय अभ्यास
**प्रा. शशिकांत दतोपंत परळकर** ...................... २२

३. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
**प्रा. डॉ. तंगलवाड डी.एम.** ...................... २५

४. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
**प्रा. बाळासाहेब विश्वनाथ मुंडे** ...................... २९

५. राजर्षि शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
**प्रा. सायली समुद्रे** ...................... ३१

६. राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
**प्रा.डॉ.आचार्य आर.डी.** ...................... ३४

७. राजश्री शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण
**प्रा. डॉ. माधव आनेराव** ...................... ३७

८. छत्रपती शाहू महारजांचे शैक्षणिक कार्य
**प्रा. सतीश गंगाराम ससाणे** ...................... ४०

९. शैक्षणिक अमंलबजावणीकार : छत्रपती राजर्षी शाहू महाराज
**प्रा.विलास पवार** ...................... ४३

१०. राजश्री शाहू महाराजाचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिता
**प्रा.डॉ. मच्छिंद्र कडूबा सवाई** ...................... ४५

११. राजर्षि शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
**वसंत भाऊराव राठोड** ...................... ४८

१२. विषय - राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
**प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे** ...................... ५१




ISBN 978-93-5240-092-8


१३. छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य
**प्रा. रामराव चव्हाण** ...................... ५३

१४. राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्य निवारण व त्यांच्या शिक्षणविषयक कार्य
**प्रा. बी.पी. पवार** ...................... ५६

१५. राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक योगदान
**प्रा. डॉ.कावळे बी.एन.** ...................... ५९

१६. राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता.
**डॉ.सुनंदा एकनाथराव आहेर** ...................... ६२

१७. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे स्त्री शिक्षणातील योगदान
**प्रा.बाविस्कर रविंद्र बाबुराव** ...................... ६६

१८. राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक धोरण व आजची परिस्थिती
**प्रा.संध्या पेंडकर देशपांडे** ...................... ६८

१९. शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण
**प्रा.डॉ.माधव कदम** ...................... ७१

२०. अधुनिक शिक्षणनिती मध्ये राजर्षी शाहूंच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता - एक अभ्यास
**प्रा. डॉ.एन. एन. कुंभारीकर** ...................... ७३

२१. राजर्षी शाहू महाराज : सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याचे जनक
**प्रा.ज्ञानेश्वर डाखोरे, प्रा.डॉ. शिंदे आर.डी.** ...................... ७५

२२. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक योगदान
**प्रा. एस. सय्यद** ...................... ७८

२३. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार व आजची स्थिती
**प्रा.चावरे एम. व्ही** ...................... ८०

२४. राजर्षी शाहू महाराजांचा शैक्षणिक दृष्टीकोण
**प्रा.गौतम कांबळे** ...................... ८२

२५. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार
**प्रा.डॉ. कदम डी.एम.** ...................... ८४

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISBN 978-93-5240-092-8


२६. राजर्षि शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
**डॉ. जितेंद्र पुंडलिकराव कोकणे** ........................ ८६

२७. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा आणि
वर्तमान काळातील प्रस्तुतता
**ढाकणे नितीन सोपानराव** ........................ ८९

२८. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व त्याची प्रासंगिकता
**भागवत दगडुबा गोरे** ........................ ९१

२९. राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक सुधारणा आणि वर्तमान काळातील प्रस्तुतता
**प्रा. विजयसिंग भाबरदोडे** ........................ ९३

३०. राजर्षी शाहू महाराजांचे आरक्षण धोरण
**प्रा.तेलंगे एन.एन** ........................ ९६

३१. राजर्षी शाहू महाराजांची आरक्षणविषयक भूमिका
**प्रा.डॉ.गितांजली मोटे** ........................ ९८

३२. राजर्षी शाहू महाराजांचे आरक्षण धोरण व आरक्षणाचे विरोधक
**प्रा.डॉ.बी.एम.गोरे** ........................ १००

३३. राजर्षि शाहू महाराजांची आरक्षण विषयक भूमिका
**प्रा. भोसले एस.ई.** ........................ १०३

३४. राजर्षि शाहू महाराजांची आरक्षण विषय भूमिका
**प्रा.कुकडे बी.जे.** ........................ १०६

३५. राजर्षी शाहू महाराज व सत्यशोधक समाज
**प्रा. डॉ. मुळे ए. बी., प्रा. डॉ. सपाटे ए. के.** ........................ १०९

३६. राजर्षी शाहू महाराज व सत्यशोधक समाज
**डॉ. नानासाहेब जाधव, प्रा. अंगद कोते** ........................ ११२

३७. राजर्षी शाहू सत्यशोधकी होते का?
**डॉ. राजेंद्र शेजुळ** ........................ ११५

३८. राजर्षी शाहू महाराजांची सत्यशोधक चळवळ
**डॉ.संतोष कोल्हे, प्रा.संदीप पाटील** ........................ ११९

३९. राजर्षी शाहू महाराज- सत्यशोधक समाज
**प्रा. मुंडे ज्योती** ........................ १२२

४०. कृषि व शिक्षणविषयक सुधारणा व राजर्षी शाहू
**आबासाहेब माणिकराव देशमुख** ........................ १२४

४१. राजर्षी शाहू महाराजांचे शेतकरी विषयक आर्थिक धोरण
**प्रा. यादव घोडके** ........................ १२७

४२. राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक विचार
**प्रा.किरण येरावार, डॉ.सूर्यकांत पवार** ........................ १३०

४३. राजर्षी शाहू छत्रपती महाराजांचे आर्थिक विचार- एक दृष्टीक्षेप
**प्रा.डॉ.श्रीराम हनमंतराव भालेराव** ........................ १३३

४४. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सर्वसमावेशक आर्थिक
वृध्दीचे विचार आणि कार्य
**डॉ. एस.ई. घुमटकर** ........................ १३६

४५. राजर्षी शाहू महाराजांचे सहकार विषयक विचार व सद्यस्थिती
**प्रा. किरण रामचंद्र फडणीस** ........................ १३९

४६. राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार
**प्रा. केंद्रे मनिषा धनराज** ........................ १४१

47. Rajashri Shahu Maharaj: Social Reformer,
Leader and an Ideal Ruler.
**Prof. Rathod Ramesh Dhondiram** ........................ १४२

४८. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा आणि
वर्तमान काळातील प्रस्तुतता
**प्रा. राठोड ईश्वर ल.** ........................ १४७

४९. राजर्षी शाहूंचा सामाजिक न्यायविषयक दृष्टिकोन
**डॉ.नारायण तु.कांबळे** ........................ १५१

५०. राजर्षी शाहू महाराज आणि दलित समाजजीवन
**प्रा.गायकवाड डी.बी.** ........................ १५५

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISBN 978-93-[illegible]240-092-8


५१. राजर्षी शाहू महाराज आणि त्यांचे कार्य

**प्रा. [illegible]राम के. मोगल** ......................

५२. छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक विचार

**मोकासरे गणेश तुकाराम** ......................

५३. अंधश्रध्दा निर्मुलनात राजर्षी शाहू महाराजांचे योगदान : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. मुंडे रामकिशन हरीदास** ......................

५४. प्रजाहितदक्ष प्रशासक राजर्षी शाहू महाराज

**प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता गोविंदराव** ...................... १६६

५५. राजर्षी शाहू महाराजांचे लोकाभिमुख प्रशासन

**डॉ. वितेश भारत निकते** ...................... १७०

५६. छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक सुधारणा विषयक कार्याचा अभ्यास

**प्रा. चामे एच.व्ही.** ...................... १७३

५७. बहुजनांचा कैवारी : राजर्षी शाहू महाराज

**प्रा. पांडूरंग भिवाजी गोरे** ...................... १७७

५८. राजर्षी शाहू महाराज यांचे दलितविषयक कार्य

**डिगोळे सपना ज्ञानोबा** ...................... १८०

५९. राजर्षी शाहूंचे सामाजिक विचार आणि कार्य

**गुसिंगे चरणसिंग हारसिंग** ...................... १८३

६०. राजर्षी शाहू महाराजांचे जलनिती विषयक धोरण

**प्रा. नंदकुमार कुकलारे** ...................... १८४

61. Great Contribution of shri Chhatrapati ShahuMaharaj to Indian Caste Reservation Systems

**Dr. Dashrath Jadhav** ...................... १९०

62. Feminism Approach of Rajarshi Shahu Maharaj

**Prof. C.D.Kamble** ...................... १९४

63. Shahu Maharaj A Democratic King

**Nita Rameshwar Kalaskar** ...................... १९७

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISBN 978-93-5240-092-8

# ५४. प्रजाहितदक्ष प्रशासक राजर्षी शाहू महाराज

प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता गोविंदराव
लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय
सोनपेत जि.परभणी (महाराष्ट्र) ४३१५१६

## प्रस्तावना :-

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्याची सर्वांगिण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष प्रशासक म्हणजे राजर्षी शाहू महाराज होत. राजर्षी शाहू महाराजांना आपल्या राज्यातील प्रत्येक व्यक्तीबद्दल आस्था होती. विचारपुर्वक स्वीकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय तत्वांच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता, या तत्वांची अमंलबजावणी करण्यासाठी आवश्यक असणारे मानसिक धैर्य छत्रपती शाहू महाराजांजवळ होते. त्यांच्या कार्यामुळे ते केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले. एक आदर्श राजा , बहुजन समाजाचा नेता, प्रजेला आपल्या ह्रदयात स्थान देणारा नेता म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम टिकली. बहुजन समाजावर शतकानुशतके निरनिराळी सामाजिक व धार्मिक बंधने लादली होती. त्या बंधनातून बहूजनांची सुटका करून, त्यांना सुशिक्षित, जागृत व प्रगत केले. आपल्या या कार्यावर होणारी प्रचंड टीका त्यांनी सहन केली, परंतु आपल्या ध्येय धोरणात व कार्यपद्धतीत कोणताही बदल केला नाही. म्हणूनच राजर्षी शाहू महाराज प्रजाहितदक्ष प्रशासक म्हणून संपूर्ण भारतात शतकानुशतके ओळखले जातील.

## संशोधन पध्दती

### तथ्य संकलन :-

प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे. संदर्भग्रंथ, मासिक, वृत्तपत्र इ दुय्यम स्त्रोतांचा आधार घेऊन हा शोध निबंध लिहिला आहे.

### शोधनिबंधाचे उद्देश :-

१) राजर्षी शाहू महाराजांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करणे.
२) राजर्षी शाहू महाराजांच्या सर्वांगिण कार्याचा अभ्यास करणे.
३) राजर्षी शाहू महाराजाच्या धोरणांची आधुनिक भारतीय समाजातील आवश्यकता स्पष्ट करणे.

### गृहितकृत्य :-

* राजर्षी शाहू महाराज हे सर्वसामान्य जनतेचे नेते होते.
* आजच्या राज्यकर्त्यामध्ये जनहिताच्या भावनेचा अभाव आहे.



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISBN 978-93-5240-092-8

राजर्षी शाहू महाराजांची आपल्या अठ्ठाविस वर्षाच्या कारकीर्दीत अनेक महत्त्वपूर्ण कार्ये केली. आपणास मिळालेल्या सत्ता अधिकाराचा उपयोग संस्थानातील सामान्य जनतेच्या हितासाठी करण्याचा प्रयत्न केला. राज्यातील सामाजिक विषमता दूर करून समाजांतील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याच्या हेतूने त्यांनी बहूजन समाजाचे नेतृत्व स्वीकारले. संस्थानातील समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्याचा विडा उचलला `२ एप्रिल १८९४ रोजी अधिकार ग्रहण करताना राजर्षी शाहू महाराजांनी प्रजाजनांना जाहीर केले की, आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावते. त्यांच्या हिताची एक सारखी अभिवृत्ती होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा, अशी आमची उत्कट इच्छा आहे. यासाठी सर्वोच्च्या उज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हाला आवश्यकता आहे.'[१]

## शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्ये :-

राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक सुधारणेच्या विचारांचा पुरस्कार करून शिक्षणाला प्रमुख स्थान दिले. राजर्षी शाहू महाराजांनी अधिकारग्रहण केले त्यावेळी बहुजन समाजातील असंख्य लोक अज्ञान व दारिद्र्याचे जीवन जगत होते. छत्रपती शाहू महाराजांची या अज्ञानी बहुजन समाजात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा निश्चित केला. बहुजन समाजाला, स्त्रियांना सुशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यत सोय उपलब्ध करून देण्याचे धोरण त्यांनी आखले. शैक्षणिक प्रगतीत येणाऱ्या सर्व अडचणींवर मात करण्याचे त्यांनी ठरवले. शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झालेली नाही. असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम, मुत्सद्दी लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत, म्हणुनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे`.[२] ही राजर्षी शाहू महाराजांची विचारसणी होती. म्हणून त्यांनी आपल्या संस्थानातील बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी अंदाजपत्रकात भरीव तरतूद केली. कालबध्द आखणी केली. प्रत्येक गावात एक तरी शाळा असावी यासाठी प्रयत्न केले. बहुजन समाज तसेच स्त्री शिक्षणासाठी महाराजांनी प्रयत्न केले. प्राथमिक शिक्षणाबरोबरच उच्च व व्यवसाय शिक्षणाली महत्व दिले. शाळा, महाविद्यालयाची स्थापना तर केलीच पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केले. विद्यार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची मोफत सोय केली.

## सामाजिक कार्ये :-

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या अधिकाराचा वापर करून अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या यासाठी त्यांनी आपल्या मत्सद्देगिरीचा पुरेपुर वापर केला. महात्मा फुले यांचा मानवतावाद व न्या.रानडे यांनी परंपरानिष्ठ, समन्वयशील, वास्तवाभिमुख दृष्टी यांची सांगड घालून शाहू महाराजांनी महाराष्ट्रात ब्राम्हणेत्तर चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. `शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून विविध समतावादी कार्याची जोड राजसत्तेला दिली व एका असंस्कृत समाजाला सुसंस्कृत बनवण्याचा प्रयत्न सत्तेच्या माध्यमातून केला. भारतीय समाजव्यवस्थेचे जन्मावरून असणारे एखाद्या व्यक्तीचे महत्व बाजूला सारून कर्माला महत्व दिले. आपला समाज प्रधान गुणवत्ता प्रधान मुल्यांच्या आधारावर सुसंस्कृत बनवण्याचा प्रयत्न केला. कुठलाही

ISBN 978-93-5240-092-8

व्यक्ती जन्माने अथवा खाण्या-पिण्याने श्रेष्ठ कनिष्ठ बनत नाही तर त्याच्या ठिकाणी असलेल्या कार्यक्षमतेच्या बळावर तो श्रेष्ठ अथवा कनिष्ठ बनत असतो.`[३] ही विचार सरणी बाळगणारे व आपल्या प्रशासनामध्ये कोणताही भेदभाव न करता समतेचा व न्यायाचा पाठपुरावा करणारे राजर्षी शाहू महाराज होते. त्यांच्या या विचारांचा प्रभाव आधुनिक महाराष्ट्राच्या जडण-घडणीत महत्वाचा ठरणारा आहे.

राजसत्ता ही रयतेच्या विकासासाठी वापरण्याचा मानदंड छत्रपती शिवाजी महाराजानंतर राजर्षी शाहू महाराजांनी महाराष्ट्राला घालून दिला हे सत्ताधिश आपल्या मातीवर व या मातीतल्या लोकांनावर अफाट प्रेम करणारे. रयतेच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या या महापुरूषांनी श्रेष्ठ-कनिष्ठाऐवजी कर्तबगारी, कर्तत्वाला महत्व दिले. सामाजिक विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला `जातिभेद निर्मूलनांच्या संदर्भात महाराजांनी केवळ विचार मांडले नाहीत तर, आपल्या वैयक्तिक आचारणाने याविषयी समाजासमोर आदर्श ठेवला. आवश्यक तेथे कायदे करून या विचाराच्या अंमलबजावणीचे कार्य केले`.[४]

आंतरजातीय विवाहाचा कायदा केला व आपल्या राजघराण्यात अशा प्रकारचा आंतरजातीय विवाह घडवून आणला. विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता दिली. जातिनिर्मूलन, अस्पृश्योध्दार, स्त्रीशिक्षण, ब्राम्हण्याला विरोध, ब्राम्हणेतरांची जागृती इत्यादी क्षेत्रात नवीन अचार विचारांना प्ररेणा देऊन त्यांनी सामाजिक जीवनाचे चित्र बदलण्याचा प्रयत्न केला.[५] आरक्षणाची तरतूद करून मागास जातीच्या लोकांचा उध्दार करण्याचे महान कार्य महाराजांनी केले.

**कृषि व जलव्यवस्थापन :-**

राजर्षी शाहू महाराजांनी कृषि विकासावरही विशेष भर दिल्याचे दिसते. शाहू महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थानात सुरु झालेली हरितक्रांती ही महाराष्ट्रातील पहिली क्रांती होती. म्हणून हरितक्रांतीचे जनकत्व शाहू महाराजांकडे जाते. आपल्या राज्यात बहुसंख्य जनता शेतकरी आहे. हा शेतकरी अज्ञान व दारिद्र्यामुळे सामाजिक दृष्ट्या मागासलेला आहे. तसेच त्याच्यावर आस्मानी संकट कधीही कोसळतात. यामुळे तो अतिशय दैन्य अवस्थेत असल्याचे महाराजांनी जाणले. या सर्व बाबींवर उपाययोजना करण्याचे राजर्षी शाहू महाराजांनी ठरविले.

`महाराज परदेश दौऱ्यावर जात असत तेंव्हा तेथील शेतीविषयक धोरणांची माहिती घेण्यास ते अधिक उत्सूक असत. आधुनिक पध्दतीने शेती करण्यावर त्यांचा अधिक भर होता. त्यांच्या मते शेतकऱ्यांचे अज्ञान व निरक्षरता, भांडवलाची कमतरता, शेतीचे बिन किफायतशीर आकारमान, विक्री बाबत संघटनेचा अभाव या कृषी क्षेत्रातील महत्वाच्या अडचणी आहेत.`[६]

राजर्षी शाहू महाराजांनी कृषि क्षेत्रातील या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांना कृषी शिक्षण दिले, ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. गावातील शाळेतच शेतकऱ्यांना शेतीविषयक शिक्षण देण्याची व्यवस्था केली. `शेतकऱ्यांकडे भांडवलाची कमतरता असल्याचे आढल्यानंतर ती दूर करण्यासाठी त्यांनी संस्थानात विविध निधी मार्फत निधी स्थापून शेतकऱ्यांना कर्ज व मदतीची व्यवस्था केली. त्याचबरोबर शेतीमाल विक्रीसाठी सहकारी पतपेढ्या स्थापन करायला प्रोत्साहन दिले`.[७]



ISBN 978-93-5240-092-8

राजर्षी शाहू महाराजांनी १९०२ साली आपल्या संस्थानासाठी अपूर्व असे सार्वजनिक धोरण जाहिर केले. स्वतंत्र पाठबंधारे खाते करून त्यावर खास जलसिंचन अधिकाऱ्याची नेमणूक केली. संस्थानातील जुन्या विहिरी, छोटे-मोठे तलाव, लहान मोठे बंधारे या सर्वांच्या नोंदी करून त्यांची दुरूस्तीची कामे हाती घेण्यात आली. पावसाच्या पाण्याचा प्रत्येक स्त्रोत अडवण्याचा प्रयत्न सुरु झाला. महाराजांनी सह्याद्रीच्या घाटात भोगावती नदीचा जलप्रवाह अडविण्याऱ्या धरणाची महत्वकांक्षी योजना आखून ती पूर्ण केली . तीच आज कोल्हापूर जिल्ह्याची वरदायिनी ठरली आहे.

**निष्कर्ष :-**

या शोधिनिबंधातून राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यातून समाजहित, लोककल्याण, समता, स्वातंत्र्य न्याय कसा प्रस्थापित झाला याची स्पष्ट कल्पना येते. त्यांना आरक्षणाचे जनक म्हणून ओळखले जाते यावरून आजच्या काळात त्यांच्या विचारांची आवश्यकता लक्षात येते. आजही भारतात सामाजिक व आर्थिक विषमतेची दरी वाढलेली आहे. समता व सामाजिक न्याय वास्तवात प्रस्थापित झालेलाच आहे असे म्हणता येत नाही. बेरोजगारी,भुकमारी, कुपोषण, महिला सुरक्षा, पर्यावरणाचा असमतोल, पाणी प्रश्न, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या अशा मूलभूत समस्यांची सोडवणूक करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत आणण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी नैतिक, विवेकी राजकारणी निर्माण होणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :-**


१) भारत वाघमारे संकलीत, राजर्षी छत्रपती शाहू महाराज जीवन आणि शैक्षणिक विचार, प्रबुध्दभारत प्रकाशन, नागपूर पृ.क्र. १२

२) उपरोक्त पृ.क्र. १३

३) Rajarshi Shahu Maharajs Thought in २१st Century, Editor by Mulgir M.T. पृ.क्र. ३६७

४) भारत वाघमारे संकलीत, राजर्षी छत्रपती शाहू महाराज जीवन आणि शैक्षणिक विचार, प्रबुध्दभारत प्रकाशन, नागपूर पृ.क्र. २८

५) उपरोक्त पृ.क्र. २८

६) Rajarshi Shahu Maharajs Thought in २१st Century, Editor by Mulgir M.T. पृ.क्र. ३६५

७) उपरोक्त पृ.क्र.३६५

८) भारत वाघमारे संकलीत, राजर्षी छत्रपती शाहू महाराज जीवन आणि शैक्षणिक विचार, प्रबुध्दभारत प्रकाशन, नागपूर पृ.क्र. ३०


***

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani